# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र.295/२०२२

विद्यापीठ परिसरातील संबंधीत विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, विद्यापीठातील वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी नेट परीक्षेसाठी अर्ज भरलेला आहे व वसतिगृहात ऑगस्ट २०२२ पर्यंत राहण्याची परवानगी मागितलेली आहे, या पार्श्वभुमीवर नेट या परीक्षेसाठी ज्यांनी फॉर्म भरलेला आहे, त्यांना खालील अटींवर राहण्यास परवानगी देण्यात येईल.

१) सदरील प्रवेश तात्पुरत्या स्वरुपात दि. ३० ऑगस्ट २०२२ पर्यंत देण्यात येईल, त्या पुढे विद्यार्थ्यांनी वसतिगृहाची जागा रिकामी करावी लागेल.

२) सदरील व्यवस्था ही दि. ३० ऑगस्ट २०२२ अखेर किंवा नेट परीक्षा संपेपर्यंत जे अगोदर घडेल तोपर्यंत असेल.

३) मुद्दा क्र २ मध्ये नमूद केलेल्या कालावधीसाठी रु. १०००/- अनामत रक्कम (पूर्वी भरलेली नसेल तर) व वसतिगृह शुल्क रु. १२००/- अशी एकत्रित रक्कम रु. २२००/- भरावी लागेल.

४) वसतिगृह खोलीचा ताबा मुद्दा क्रं २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत दि. ३० ऑगस्ट २०२२ पूर्वी वसतिगृह कार्यालयास सुपूर्त करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यापुढे प्रतिमहिना रु. १०००/- वसतिगृह शुल्क आकारले जाईल, तसेच अनामत रक्कम जप्त केली जाईल.

५) सदर परवानगीसाठी विद्यार्थ्यांनी स्वलिखीत अर्ज करुन मा. विभागप्रमुखांची शिफारस घेणे तसेच नेट परीक्षेसाठी भरलेल्या फॉर्मची/हॉल तिकीटाची प्रत सोबत जोडावी.

03/08/22

मुख्य वसतिगृह प्रमुख

**मुख्य वसतिगृह प्रमुख**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**गणेशखिंड, पुणे-४११००७.**

गणेशखिंड, पुणे — ४११००७
संदर्भ :— सा.फु.पु.वि./वसतिगृह/२०२२/९९०
दिनांक :— ०२/०८/२०२२

**प्रत माहितीसाठी सादर :—**

मा. विभागप्रमुख :— आपल्या विभागातील विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे, ही विनंती.